**<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.६०/२०१०</u>**

**<u>निशाणी ११० वरील आदेश</u>**

**(विनायक अणावकर वि. मुख्य कार्यकारी अधिकारी सिंधुदुर्ग व.)**

**<u>CNR.No.MHSI04-000219-2010</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ ते ८ व १० यांनी अभिलेखावर दाखल करून प्रस्तुतकामी ज्यादाचा मुद्दा काढणेची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी यांचे कथनानुसार या न्यायालयाने निशाणी ९८ वर मुद्दे काढलेले आहेत. परंतु, प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटनाक्रमानुसार वादी व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी दावा मिळकत त्रयस्थ व्यक्तींना विक्री केल्याने तशी दुरूस्ती त्यांचे निशाणी ७२ वरील कैफियतीमध्ये केलेली आहे. यावरून वादी व प्रतिवादी क्र.४ व ५ याचा दावा मिळकतीमधील असणारा हक्क, मालकी व ताबा संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी निशाणी ७२ वर केलेल्या दुरूस्तीअन्वये प्रस्तुतकामी पुढील जादाचा मुद्दा निशाणी ९८ वरील मुद्दयामध्ये वाढविणे गरजेचे आहे.

> “ Whether the suit is not tenable in view of the alienation of Title, Interest and Possession of the suit property by the plaintiff and defendant Nos. 4 and 5 to Smita Keshav Parab, Darshana Dileep Shintre, Namrata Naresh Parab and Govind Raghunath Aambradkar during the pendency of the suit ?”

३. प्रतिवादी यांनी सदरचा मुद्दा निशाणी ९८ वरील मुद्दयामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम ५ अन्वये नमूद करून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केलली आहे.

४. वादी यांनी सदर अर्जास निशाणी ११२ वर त्यांचे म्हणणे सादर करून सदर अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. त्यांचे कथनानुसार प्रतिवादी यांनी केलेली मागणी ही चुकीची व कायदयातील तरतुदींच्या विरूध्द आहे. प्रस्तुतचा अर्ज निव्वळ याकामी विलंब होण्याच्या गैरउद्देशाने

प्रतिवादी यांनी दिला असल्याने तो नामंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

**५.** अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी व वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांनी कथन केल्याप्रमाणे त्यांनी त्यांची निशाणी ७२ वरील कैफियत दुरूस्त केले असल्याचे दिसून येत आहे. सदर कैफियतीमधील परिच्छेद क्र.१७ चे अवलोकन केले असता, वादी व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी दावा मिळकत त्रयस्थ व्यक्तींना विक्री केल्याचे प्रतिवादी यांनी कथन केलेले आहे. सदरची बाब वादी यांनी नाकारली नसल्याचे दिसून येत आहे. वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान असणारे वादविषय कायमस्वरूपी संपुष्टात येणेकरिता, तसेच दाव्यांची व अर्जांची पुनरावृत्ती टाळणेकरिता प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १४ नियम ५ अन्वये मंजूर करणे न्यायोचित असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

**१.** अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** निशाणी क्र.९८लगत मुद्दा क्र.३अ म्हणून पुढीलप्रमाणे अतिरिक्त मुद्दा नोंद करणेत येत आहे.

मुद्दा क्र. ३अ

" Whether the suit is not tenable in view of the alienation of Title, Interest and Possession of the suit property by the plaintiff and defendant Nos. 4 and 5 to Smita Keshav Parab, Darshana Dileep Shintre, Namrata Naresh Parab and Govind Raghunath Aambradkar during the pendency of the suit ?"

**३.** खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–

( जी.ए.कुलकर्णी )

दिनांकः–२८.०२.२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),कुडाळ.